RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN- 2348-7143
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452, (GIF) –0.676 Special Issue – 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

# भारतातील अन्न सुरक्षा कायदा व मानवी हक्क

**प्रा.बाळासाहेब जोगदंड**
विभागप्रमुख,अर्थशास्त्र विभाग, आर.बी.अट्टल महाविद्यालय,गेवराई ता.गेवराई जि.बीड

---

**प्रस्तावना :**

जागतिक स्तरावर विविध संघटनांनी जागतिक प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. या संघटनांच्या माध्यमातून आरोग्य, शिक्षण, बालमजूरी, बाल गुन्हेगारी, महिला हक्क, इ.समस्यांवर संशोधन करून मानवाला आपले हक्क मिळवून देण्याचा प्रयत्न केला. 1945 मध्ये संयुक्तराष्ट्र संघाची स्थापना झाली त्यावेळेपासून मानवी हक्कासाठी आणि मानवाच्या प्रगतीसाठी कार्य सुरू झाले. प्रत्येक देशातील मानवाला शांततामय सदृढ, प्रगतशील, जीवन जगता यावे यासाठी 1948 मध्ये संयुक्तराष्ट्राच्या सदस्य देशांनी मानवी हक्काचा प्रस्ताव स्विकारला. तेव्हापासून 10 डिसेंबर हा दिवस जागतिक मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. मानवी व्यक्तिमत्वाची जन्मजात प्रतिष्ठा, योग्यता आणि स्त्री-पुरुषांचे समान हक्क तसेच मानवास भाषण स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, शिक्षण घेण्याचे स्वातंत्र्य, धर्म स्वातंत्र्य, शोषण मानवी मूल्यनिष्ठता, कला व संस्कृती, इ.विषयाच्या संदर्भात अपेक्षा सुरक्षित राहण्यासाठी 10 डिसेंबर 1948 रोजी मानवी हक्कांची सार्वभौम घोषणा करण्यात आली.

**भारतात मानवी हक्क आयोगाची स्थापना :-**

1992 मध्ये राष्ट्रकुल परिषदेने प्रत्येक देशांमध्ये मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी सर्वच राष्ट्रांमध्ये मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली. भारतात राष्ट्रीय पातळीवर मानवी हक्क संरक्षण कायदा 1993 मध्ये संमत झाला. या कायद्यानुसार भारतात 28 सप्टेंबर 1993 रोजी राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. त्या कायद्यानुसारच देशातील प्रत्येक राज्यात राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली. याचा मुख्य उद्देश देशातील प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे संरक्षण प्रभावीपणे व्हावे. 6 मार्च 2001 रोजी महाराष्ट्रात मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला. मानवी हक्कांची अंमलबजावणी जागतिक पातळीवर प्रभावीपणे होत असल्याने देशातील प्रत्येक राज्यातील मानवाला आपले हक्क संरक्षित करण्याचा मजबूत अधिकार प्राप्त झाला. व्हिएन्ना येथे झालेल्या "जागतिक मानवी हक्क परिषद-1993"ने असे निर्देशित केले की, "सर्व राष्ट्रांनी राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक व्यवस्थांचा विचार न करता मानवी हक्कांचे संवर्धन आणि जतन याबाबतीचे कर्तव्य जबाबदारीने पार पाडावे."

**मानवी हक्काच्या व्याख्या :-**

1) मानवी हक्क संरक्षण कायदा -1993 नुसार " मानवी हक्क म्हणजे असे हक्क की, जे आरोग्य, शिक्षण, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा, मानवी मूल्य, इ.संबंधीत असून मानवाच्या प्रगतीसाठी प्रेरक व संरक्षक ठरतात."

2) मिराजी जे.पी.एस.-"संयुक्त राष्ट्रसंघ द्वारा सर्व लोकांद्वारे मानवाच्या जीवनाशी आणि स्वातंत्र्याशी संबंधीत सर्व प्रकारचे संरक्षण प्राप्त करून देणे म्हणजे मानवी हक्क होय.

वरील व्याख्यांवरून असे लक्षात येते की मानवी हक्क ही संकल्पना मानवाला सर्व पातळीवर कायदेशीर अधिकार व स्वातंत्र्य प्राप्त करून देते. त्यामुळे मानवाला ( महिला, बालके, दिव्यांग, मागास प्रवर्ग इ. सर्व घटकाला ) जीवन जगतांना कोणत्याही हिंसेचा अथवा कोणत्याही दबावाला बळी पडू दिले जात नाही. मानवाचे हक्क हे जन्मल्यापासून प्राप्त होतात. जसे की जगण्याचा हक्क, शिक्षणाचा हक्क, संरक्षण प्राप्त करण्याचा हक्क, महिलांचा हक्क, बालकांचा हक्क, रोजगाराचा हक्क, अन्न मिळविण्याचा हक्क, दिव्यांग व्यक्तींचे हक्क, इ.हक्क मानवाला जीवन जगण्यासाठी संरक्षण प्राप्त करून देतात. भारतासारख्या देशात दारिद्रय, बेरोजगारी, अल्प उत्पन्न इ. समस्या असल्यामुळे बहुतांश लोकांना जीवनाची किमान पातळी गाठता येत नाही.

भारतात अन्नसुरक्षा ही एक महत्वपूर्ण समस्या भेडसावत आहे. देशातील जवळपास 67टक्के लोकसंख्या पुरेसे अन्न प्राप्त करू शकत नाही. त्यामुळे देशातील या लोकसंख्येला त्यांचा हक्क प्राप्त करून देण्यासाठी 2013 मध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायदा 2013 संमत करून देशातील जवळपास 67 टक्के लोकसंख्येला अन्न सुरक्षा प्राप्त करून दिली आहे.

**भारतातील मानवी हक्कांची अंमलबजावणी :**

भारतात मानवी हक्कांच्या अंमलबजावणीसाठी व संरक्षणासाठी घटनात्मक व वैधानिक उपाय करण्यात आले आहेत. व्यक्तीच्या मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास घटनेच्या कलम 32 मध्ये घटनात्मक उपायांचा हक्क देण्यात आला आहे. उल्लंघन झालेले मूलभूत हक्क सर्वोच्च न्यायालयाकडून पुन्हा प्राप्त करून घेण्याचा हक्कदेखील मूलभूत हक्क म्हणून घटनेत नमूद करण्यात आला आहे. 1948 मधील मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा व 1966 मधील नागरी व राजकीय हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा आणि आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा आंतरराष्ट्रीय करारनामा. या करारावर स्वाक्षरी करणाऱ्या राष्ट्रांना आपल्या राष्ट्रीय कायद्यामध्ये तरतूदी करून त्याची अंमलबजावणी करणे बंधनकारक ठरते.
मानवी हक्कांचा प्रचार, प्रसार आणि संरक्षण या हेतूने उपलब्ध संसाधनांच्या सहाय्याने जगभरात संयुक्त राष्ट्रसंघ आंतरराष्ट्रीय व प्रादेशिक संस्था कार्य करीत आहेत. भारतात मानवी हक्कांच्या प्रभावी संरक्षणासाठी मानवी अधिकार संरक्षण कायदा [2] सन 1993 मध्ये संमत करण्यात आला. या कायद्यान्वये राष्ट्रीय मानवी हक्क आयोग, राज्य मानवी हक्क आयोग आणि मानवी हक्क न्यायालये यांच्या स्थापनेची तरतूद करण्यात आली आहे.
भारतात राष्ट्रीय मानवी हक्क आयोग देशातील सर्व राज्यातील राज्य मानवी हक्क आयोगाच्या माध्यमातून लोकांचे हक्क संरक्षित करून सार्वभौम समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी कटीबध्द आहे. भारतातील लोकांना अन्न सुरक्षेचा हक्क कायदा 2013 तयार करून जगण्याची शाश्वती निर्माण केली आहे. प्रत्येकाला पर्याप्त मात्रेत अन्न मिळणे हा त्यांचा अधिकार आहे. आणि तो कायदेशिर अधिकार 2013 या कायद्यानुसार प्राप्त झाला आहे.



Scanned by CamScanner

RESEARCH JOURNEY International Multidisciplinary E-Research Journal | ISSN: 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452, (GIF) - 0.676 Special Issue - 130 (I) | January 2019 | UGC Approved No. 40705
The Role of Government to protect the Human Rights

**अन्न सुरक्षा हक्कामध्ये अन्न सुरक्षा कायदा 2013 ची भूमिका :**

भारतातील भूक समस्या निर्मूलनासाठी व प्रत्येकाला पर्याप्त भोजनाची गरज पूर्ण करण्यासाठी 22 डिसेंबर 2011 रोजी अन्न सुरक्षा विधेयक लोकसभेत मांडले. यावर चर्चा होऊन ते अन्न व सार्वजनिक वितरण समितीकडे अभ्यासासाठी पाठविण्यात आले. या समितीने आपला अहवाल 17 जानेवारी 2013 रोजी संसदेकडे सादर केला. आणि त्याचे 12 सप्टेंबर 2013 रोजी कायद्यात रूपांतर झाले.

अन्न सुरक्षा कायदा 2013 चे स्वरूप व्यापक असून देशातील एकूण लोकसंख्येपैकी 67% लोकसंख्या या कायद्यांतर्गत अन्न सुरक्षा प्राप्त करत आहे. या कायद्यामुळे ग्रामीण भागातील एकूण लोकसंख्येपैकी 75% लोकसंख्या व शहरी लोकसंख्येच्या 50% लोकसंख्या अन्नसुरक्षा संरक्षण प्राप्त करत आहे. या कायद्यांतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांना दरव्यक्तीमागे प्रती महिना पाच किलो अन्नधान्य दिले जाते. यामध्ये तांदूळ 3 रु. प्रती किलो, गहू 2 रु. प्रती किलो व भरडधान्य 1 रु. प्रती किलो दराने दिले जाते. या योजनेचा लाभ अन्न सुरक्षा कायद्यातील कलम 10 (1) नुसार शासनाने निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमित प्रत्येक व्यक्तीला सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातून अन्नधान्य दिले जाते. सरकारी अंदाजानुसार या योजनेसाठी 6.12 कोटी टन अन्नधान्याची आवश्यकता असून 1,24,724 कोटी रुपये खर्च आहे. अन्न सुरक्षा प्रदान करणारा हा वैश्विक स्तरावरील सर्वात मोठा कार्यक्रम आहे. अन्न सुरक्षा कायद्यांतर्गत पुढील लाभाद्वारे अन्न सुरक्षेचा हक्क जनतेला प्रदान केला जात आहे.

- प्रती व्यक्ती प्रती महिना पाच किलो अन्नधान्य.
- गर्भवती महिलांना मोफत आहार आणि प्रसूतीसाठी सहा महिन्याच्या कालावधीत सहा हजार रुपयांची आर्थिक सहायता.
- स्तनपान करणाऱ्या महिलांना एक वेळचा मोफत आहार.
- सहा महिने ते सहा वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना अंगणवाडीच्या माध्यमातून मोफत आहार.
- सहा वर्ष ते 14 वर्षापर्यंतच्या बालकांना सुट्टीचे दिवस वगळता प्रत्येक दिवशी दुपारचे मोफत जेवण.
- कुपोषित बालकांना अंगणवाडीच्या माध्यमातून विशेष आहार.
- नैसर्गिक आपत्ती व आपात्कालीन परिस्थितीमध्ये पिडीत व्यक्तींना तीन महिन्यांपर्यंत दोन वेळचे मोफत जेवण.

वरील अन्न प्राप्तीच्या सुविधांमुळे सर्व भारतातील व्यक्तींना अन्न प्राप्त होत आहे. तसेच स्थानिक सरकार, राज्य सरकार व केंद्र सरकार यासाठी तत्पर राहिले आहे.

अन्न सुरक्षा विधेयक अन्न मिळविण्याच्या नागरिक अधिकाराला दिशा देणारे पहिले पाऊल आहे. या विधेयकाच्या माध्यमातूनच शून्य भूक योजना (झिरो हंगर प्रोग्राम) पूर्ण होण्यासाठी हातभार लागत आहे. अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करून मानवी हक्काचे संरक्षण करण्यासाठी सार्वजनिक वितरण प्रणालीची (पी.डी.एस.) भूमिका आवश्यक आहे.

**जागतिक भूक निर्देशांकामध्ये भारताची स्थिती :**

सन 2013 पासून भारतात अन्न सुरक्षा कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे. त्यानुसार सर्व प्रदेशातील प्रत्येक व्यक्तीला पर्याप्त प्रमाणात अन्नाचा पुरवठा केला जातो. परंतु 2013 नंतर आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेने (IFPRI) घोषित केलेल्या जागतिक भूक निर्देशांकामध्ये भारताचे स्थान सातत्याने घसरत आहे. 119 देशांच्या यादीमध्ये 2014 या वर्षात भारताचा क्रमांक 55 वा होता. त्यानंतर 2015 मध्ये 80, 2016 मध्ये 97 वा 2017 मध्ये 100 व्या स्थानी तर 2018 मध्ये 103 व्या स्थानी भारताची घसरण झाली. शेजारील देशांशी तुलना करता बांग्लादेश व पाकिस्तान वगळता इतर देशांच्या मागे भारताचा क्रमांक लागतो. म्हणजेच भारताने अन्न सुरक्षेसाठी कायदा पास करूनही सर्व लोकांना अन्न सुरक्षेची हमी आजपर्यंत देऊ शकलेला नाही. अन्न सुरक्षा प्राप्त करणे हा देशातील लोकांचा मानवी हक्क असला तरीही सर्व लोकांना तो हक्क प्राप्त झाला असे दिसत नाही.

**संदर्भसूची :**

1. सोनवणे विलास व भालेराव सुरेश (2015), मानवी हक्क : सिध्दांत आणि व्यवहार, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
2. स्वामीनाथन् मधुरा (2013), खाद्य सुरक्षा अधिनियम का क्रियान्वयन, योजना (दिसंबर 2013)
3. Narsiah M.L. (2007) Poor and the Human Rightss, Discovery Publishing House, New Delhi.
4. Pattanaik S.M.(2011), Burning Issues of Human Rightss, Yking Bookss Jaipur.
5. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता दर्पण, साहित्य सिरीज, (वार्षिक अंक 2016-17) आग्रा.



Scanned by CamScanner

74. बालकांचे हक्क आणि आंतरराष्ट्रीय संघटना 199
प्रा. वैशाली माधवराव दिवे

75. मानवी हक्क : बालहक्क दृष्टिकोन 201
प्रा. आर.बी.काळे

76. नैतिकता के कटघेरे में दमतोड़ता मानवाधिकार 203
प्रा.डॉ. अरविंद अंबादास घोडके

77. मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण 205
डॉ.सुरेखा सदाशिवराव शिंदे

78. मानवी अधिकार आणि भारतीय राज्यघटना २०७
प्रा.डॉ. जगदीश देशमुख

79. मानव अधिकार व बालकामगार 210
प्रा.सोनटक्के रमेश शंकरराव

80. मानवी हक्कांचे स्वरुप 213
डॉ.शिंदे एस.के.

81. मानवी अधिकार आणि स्वयंसेवी संघटना 215
डॉ. जाधव संजयकुमार हनुमंतराव

82. भारतातील अन्न सुरक्षा कायदा व मानवी हक्क 217
प्रा.बालासाहेब जोगदंड

83. मानव अधिकार आणि महिला राजकारण: विशेष संदर्भ आमदार डॉ. विमलताई मुंदडा 219
आलझेंडे रेखा दौलतराव

84. भारतीय संविधानातील मानवाधिकार 222
प्रा. डॉ. सांगळे बी.एस.



Scanned by CamScanner

Impact Factor 6.261 ISSN- 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOW ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Multidiciplinary international E-research journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

18th Feb. 2019 Special Issue- 130 (I)

# THE ROLE OF GOVERNMENT TO PROTECT THE HUMAN RIGHTS

**Chief Editor**
Dr. Dhanraj T. Dhanger
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce college,
Yeola, Dist. Nashik (M.s.) India

**Executive Editor of This Issue**
Dr. Vanmala Govindrao Gundre
Principal
Yashwantrao Chavan College, Ambajogai. Dist. Beed

**Co-Editor**
Dr. Ahilya Barure
Dr. D.R. Tandale
Dr. D.B. Tanduljekar

RESEARCH JOURNEY

Scanned by CamScanner